नाशिक महानगरपालिका, नाशिक
घनकचरा व्यवस्थापन विभाग
राजीव गांधीभवन, शरणपुररोड, नाशिक ४२२००२.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्व्हेक्षण२०२१ च्या पुर्व तयारीकरीता नाशिक महानगरपालिकेसाठी कंत्राटी तत्वावर सिटी को-ऑर्डीनेटर यांची नेमणुक, स्वच्छ सर्व्हेक्षण २०२१ ची प्रत्यक्ष पाहणी संपेपर्यंत करण्यात येणार आहे.

उमेदवारांनी २७ जुलै २०२० पर्यंत dir_swm@nmc.gov.inया संकेतस्थळावर लिंक व्दारे अर्जकरावे. संबधित अटी सुचना या संकेतस्थळावर पहावे.

| पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अर्ज कोणाकडे करावा | अनुभव | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City coordinator) | ०६ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>अ.बी.ई (कोणतीही शाखा)<br>ब.बी.एस्स.सी (कोणतीही शाखा)<br>क.बी.आर्क<br>ड.बी.प्लानिंग<br>२.मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक | उमेदवाराने dir_swm@nmc.gov.in या संकेतस्थळावरील लिंकवर ऑनलाईन अर्ज सादर करावे. | महानगरपालिका/ नगरपालिका ("अ/ब" वर्ग) क्षेत्रातस्वच्छ सर्व्हेक्षण २०२१ च्या शहर समन्वयक या पदाचा किमान १ (एक) वर्षाचा कामकाज केल्याचा अनुभव असणे अनिवार्य आहे. | रुपये ३०,०००/- प्रति माह |

**अपेक्षितकामाचेस्वरूप**:-

अ) उमेदवाराची नियुक्ती नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या खालील कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे
१. हागणदारी मुक्त शहरासंबंधीची कामे (ODF. ODF+/++)
२. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची अंमल बजावणी
३. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ च्या अनुषंगीक कामे
४. कचरा मुक्त शहर अंतर्गत किमान पाच स्टार मानांक मिळविणे संबंधित कामे
५. सिटी प्रोफाईलच्या अनुषंगाने टुलकिट अंतर्गत १०० टक्के गुणांकन मिळाविण्याच्या दृष्टीने करावयाची कामे
६. एम.आय.एस (Management Information System)माहिती संकलित करणेव अद्यावत करणे.

ब) संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच संबधित विभागीय अधिकारी यांनी नेमून दिलेली स्वच्छता विभागातील इतर अनुषंगीक कामे.

**उमेदवारांसाठी सुचना**:

१. नाशिक महानगरपालिकेमार्फत मुलाखत प्रक्रियेद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. प्रत्यक्ष मुलाखतीचा वेळ व दिनांक आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
२. मुलाखतीचे ठिकाण आपणांस www.nmc.gov.inया वेबसाईटवर माहितीस्तव उपलब्ध करून देण्यात येईल.
३. मुलाखतीच्या ठिकाणी दिलेल्या वेळापत्रकानुसार उमेदवारांना शैक्षणिक अर्हता व अनुभव इ. आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ प्रत व एक स्वयंसाक्षांकीत प्रतींचा संच यासहीत स्वखर्चाने स्वत: उपस्थित राहावे लागेल.
४. ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज करण्याची शेवटची तारिख दिनांक:२७/०७/२०२०आहे.
५. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्या करीता dir_swm@nmc.gov.in या लिंकचा वापर करावा व ऑफलाईन अर्ज नमूद उपरोक्त अटीशर्ती नूसार घनकचरा व्यवस्थापन विभागात स्विकारण्यात येईल.
६. संबंधित अधिकारी, हे प्रत्यक्ष मुलाखतीनंतर पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र निर्गमित करतील.
७. वयोमर्यादा: दिनांक ०१ जुलै २०२० रोजी ३५वर्षा पेक्षा अधिक नसावे
८. नियुक्ती पत्र मिळाल्यावर उमेदवारास विना विलंब, तात्काळ नियुक्ती दिलेल्या ठिकाणी रूजु व्हावे लागेल.
९. महानगरपालिका आयुक्त तसेच नगरपरीषद/नगरपालिका क्षेत्रात मुख्यलेखाधिकारी यांचा शहर समन्वयक (सिटी को-ऑर्डीनेटर) या पदी एक वर्षाचा कामकाज केल्याचा अनुभवाचा दाखला अनिवार्य आहे.

**मागेपहा...**

**<u>अटी व शर्ती</u>** :

१. सदर पदावरील नियुक्ती ही पूर्णतः कंत्राटी तत्वावर राहील.
२. सदर कर्मचाऱ्यांना महानगरपालिका कर्मचाऱ्यांस मिळणार कोणत्याही सुविधांचा लाभ मिळणार नाही.
३. सदर नियुक्ती स्वच्छ सर्वेक्षण- २०२१ संपेपर्यंत असेल.
४. नियुक्ती कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ करण्यात येणार नाही तसेच, या नियुक्तीस स्थायित्व देण्यात येणार नाही.
५. सदर नेमणूकीमुळे मनपाच्या कोणत्याही स्थायी पदावर हक्क सांगता येणार नाही.
६. सदर अटी व शर्ती व नियुक्ती प्रक्रियेत बदल करण्याचे तथा रद्द करण्याचे राखीव अधिकार नियुक्ती प्राधिकरण, यांनी राखून ठेवलेले आहेत.

**(राधाकृष्णगमे, भा.प्र.से)**
**आयुक्त**
**नाशिकमहानगरपालिका,नाशिक.**